# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र





०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


## सौंदड (अडयाळ ) येथे घडलेल्या गुन्हयासंबंधाने आरोपीतांचे अटकसत्र सुरुच

## अफवांना बळी न पडण्याचे पोलीस अधीक्षकांचे आवाहन

दिनांक ०७/०७/२०१८ रोजी भंडारा जिल्हयातील अडयाळ पोलीस स्टेशन हद्दीतील मौजा सौंदड खापरी पुनर्वसन येथे घडलेल्या गुन्हयासंदर्भात पोलीस स्टेशन अडयाळ येथे अप. क्र. ७२/२०१८ कलम १४३, १४७, १४८, १४९, ४५२, ३२४, ३५४, ३२५ भादंवि नुसार गुन्हा नोंद करण्यात आला होता. सौंदड ग्रामवासीयांनी गुन्हयातील आरोपीतांना अटक करण्याची मागणी धरुन दिनांक ०७/०७/२०१८ रोजी रात्रीच पोलीस स्टेशन अडयाळ येथे धाव घेतली होती. तेव्हा पासुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे पोलीस अधीक्षक श्रीमती विनीता साहू, अपर पोलीस अधीक्षक रश्मि नांदेडकर हे तळ ठोकुन आहेत. सौंदड येथे घडलेल्या गुन्हयाचे तपासाकरीता विशेष तपास पथक गठीत करण्यात आले असुन तपास पथकाकडुन गुन्हयात सहभागी असलेल्या एकुण ११ आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. विशेष म्हणजे अटक करण्यात आलेल्या आरोपीतांमधे दोन्ही समुदायातील लोकं आहे. त्याच गुन्हयासंबंधाने आज दिनांक १०/०७/२०१८ रोजी आणखी ३ संशयीतांना ताब्यात घेण्यात आले आहे. ताब्यात घेण्यात आलेल्या लोकांना विचारपुस करण्यात येत आहे. गुन्हयात लिप्त असणाऱ्या आरोपीतांचा शोध घेणे सुरु असुन गुन्हयातील सर्व आरोपीतांना अटक करण्याचे दृष्टीकोणातुन गुन्हयाचा सखोल तपास करण्यात येत आहे.

**दिनांक ०८/०७/२०१८ रोजी पोलीस स्टेशन अडयाळ येथे आरोपी अटक करण्याचे मागणी संदर्भाने गोळा झालेल्या नागरीकांवर पोलीसांकडुन कोणत्याही प्रकारचा बळाचा वापर करण्यात आलेला नाही. त्याबाबत पोलीस स्टेशनच्या सीसीटीव्ही फुटेज व जमावाचे वेळी करण्यात आलेल्या व्हिडीओग्राफी तपासण्यात आलेल्या आहेत.**

पोलीस स्टेशन अडयाळ येथे दिनांक ०८/०८/२०१८ रोजी दोन्ही समुदायातील प्रतिष्ठीत नागरीकांची बैठक घेण्यात आली होती त्यामधे अपर पोलीस अधीक्षक रश्मि नांदेडकर, उपविभागीय दंडाधिकारी भंडारा श्री. अहीरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी प्रभाकर तिक्कस यांनी जनतेला शांतता राखण्याचे आवाहन केले त्यानुसार अडयाळ येथील जनतेकडुन प्रशासनाला मोठया प्रमाणात सहकार्य मिळत आहे.

दिनांक ०७/०८/२०१८ रोजी सौंदड (अडयाळ) येथे घडलेल्या प्रकरणासंबंधाने खोटया अफवांवर कोणीही विश्वास ठेवु नये असे आवाहन पोलीस अधीक्षक विनीता साहू यांनी केले आहे.

(वाय.एस.सोलसे )
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क. ७०३८०४६३९९

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.